९२२४५/४९

**कायम विनाअनुदान तत्वावर**
(माध्यम मराठी)

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा.मराठी/१२-१३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 16 JUL 2012

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, बारामती, जि.पुणे

विषयः सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम -मराठी) . . .

संदर्भः १.शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हीएलएस १००४/(५३२/२००४)-प्राशि-३, दिनाक १२ ऑगस्ट २००४.
२.आपले पत्र क्र.१७/५९/१२-१३ दिनांक ३/७/२०१२.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००४ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस **कायम विनाअनुदान तत्वावर** भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | इन्स्टिटयूट ऑफ पेडिॲट्रिक्स संचलित बालकल्याण केंद्र, कारभारी नगर, कसबा, बारामती, जि.पुणे | कारभारी नगर, कसबा, बारामती, जि.पुणे | १ ली | मराठी | जून २००४ पासून |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील [illegible]

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

(कु-हाडे सु.जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१.मा.अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४.अध्यक्ष/सचिव,
इन्स्टिटयूट ऑफ पेडिॲट्रिक्स संचलित बालकल्याण केंद्र, कारभारी नगर, कसबा, बारामती, जि.पुणे

वाचावे : १. शासन निर्णय क्रमांक प्राशान्या १६०५/(३४८/०५)/प्राशि ३ दि. ८ जुलै २००५.
२. शासन निर्णय क्रमांक माशाअ २००१/(५९९/०९)/माशि १ दि. २० जुलै २००९
३. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), शि.सं.म.रा.पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा/२०१२/तुकडया/कोल्हापूर/ ३००९८ दि. ४/५/२०१२
४. प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, बारामती, जि.पुणे यांचे पत्र क्र. १७/८४/१२/१३ दि. ४/८/२०१२

२२०४७/५०
जा.क्र.प्रा/प्राशि २/खाप्राशा-तुमा/पुवि/२०१२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १. यांचे कार्यालय.
दिनांक - 5 SEP 2012

आदेश :

मान्यताप्राप्त कायम विना अनुदानित / विनाअनुदानित / अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमधील नैसर्गीक वाढीचे प्रथम वर्ग मंजूरीबाबत.संदर्भ क्र. १ व ३ अन्वये या कार्यालयास प्राप्त अधिकारानुसार व आपले कडील संदर्भ क्र. ४ अन्वये सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावाची पडताळणी केली असता, खाली नमूद केलेल्या शाळेस उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालील अटींच्या अधिन राहून नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | इन्स्टिटयूट ऑफ पेडिॲट्रिक्स संचलित बालकल्याण केंद्र, कारभारी नगर, कसबा, बारामती, जि. पुणे | मराठी | न.पा. | इ. २ री | २००५-०६ पासून विनाअनुदान तत्वावर |
| | | | | इ. ३ री | २००६-०७ पासून विनाअनुदान तत्वावर |
| | | | | इ. ४ थी | २००७-०८ पासून विनाअनुदान तत्वावर |

१. नैसर्गिक वाढीचे वर्ग शासन निर्णय दि. २/१२/१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

२. सदर शाळांमधील प्रथम वर्गास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्या वर्गास शासन निर्णय क्रमांक माशाअ २००९/(५९९/०९)/माशि १ दि. १५ नोव्हेंबर २०११. मध्ये नमूद केलेले सूत्र लागू होईल. सदर शाळांना वर्ग मंजूरी आदेश आपण आपले स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात यावेत.

(बी.डी.फडतरे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.

प्रति,

प्रशासन अधिकारी,
नगरपालिका शिक्षण मंडळ, बारामती, जि.पुणे

प्रत १. मा.शिक्षण संचालक,(प्राथमिक),
प्रथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे १.
२ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे.
३. मुख्याध्यापक,
इन्स्टिटयूट ऑफ पेडिॲट्रिक्स संचलित
बालकल्याण केंद्र, कारभारी नगर, कसबा, बारामती, जि. पुणे